आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १,३० वाजता
१५ मे २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ऑपरेशन सिंदूर ही भारताची दहशतवादविरोधातली आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई असल्याचं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन
- पाकिस्तानी झेंडे आणि संबंधित वस्तूंच्या विक्रीबद्दल Amazon India, सह विविध ऑनलाईन पुरवठा कंपन्यांना केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाची नोटीस
- राज्यविधीमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांवर कृती करण्यासाठी राज्यपालांना समयसीमा  देण्याचा  अधिकार न्यायालयाला आहे का? अशी राष्ट्रपतींची विचारणा
- मणिपूरच्या चंदेल जिल्ह्यात काल मध्यरात्री राबवलेल्या लष्करी कारवाईत बंडखोर  गटाचे १० सदस्य ठार

  **आणि**
- खेलो इंडिया स्पर्धांचा आज समारोप

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर ही भारताची दहशतवादविरोधातली आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज केलं. ते आज जम्मू आणि काश्मीरच्या दौऱ्यासाठी श्रीनगर इथे पोहोचल्यानंतर संरक्षण दलांना संबोधित करत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा दलांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये केलेल्या कामगिरीचा संपूर्ण देशाला अभिमान आहे. संरक्षण मंत्री आणि देशाचा नागरिक म्हणून मी तुमचे आभार मानतो, अशा शब्दांत सिंह यांनी संरक्षण दलांची प्रशंसा केली.  संपूर्ण देशाच्या शुभेच्छा, आशीर्वाद पोहोचवण्यासाठी आपण इथे आलो आहोत. ऑपरेशन सिंदूर हे एक नाव नसून ती

आपली देशाच्या संरक्षणाप्रति असलेली वचनबद्धता आहे, असं राजनाथ सिंह म्हणाले....

**होल्ड.. बाईट- राजनाथ सिंह**

राजनाथ सिंह यांनी यावेळी श्रीनगरमधल्या लष्कराच्या १५व्या कॉर्प्स मुख्यालयालाही भेट दिली आणि ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर तयारी आणि घडामोडींच्या सर्व पैलूंबद्दल माहिती घेतली.

**<><><><><>**

केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने पाकिस्तानी झेंडे आणि संबंधित वस्तूंच्या विक्रीबद्दल Amazon India, Flipkart, Ubuy India, एटसी, द फ्लॅग कंपनी आणि फ्लॅग कॉर्पोरेशन यांना नोटीस बजावली आहेत. अशी माहिती केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. अशी असंवेदनशीलता खपवून घेतली जाणार नाही. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मना अशी सर्व सामग्री त्वरित काढून टाकण्याचे आणि राष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. असंही त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. पुण्यातल्या सुका मेवा व्यापाऱ्यांनीही तुर्कीएमधून येणाऱ्या सुक्या मेव्यावर बहिष्कार टाकला आहे. पुणे मार्केट यार्ड परिसरातल्या व्यापारी संघटनेनं आधी देश नंतर व्यापार, अशी भूमिका घेतली आहे.

भारत पाकिस्तान संघर्षादरम्यान पाकिस्तानच्या बाजूनं उभं राहणाऱ्या तुर्कीएसोबतचा सामंजस्य करार जवाहरलाल नेहरु विद्यापीठ-जेएनयूनं रद्द केला आहे. तुर्कीएच्या इनोनू विद्यापीठासोबत केलेला करार भारताच्या सुरक्षेचा विचार करुन रद्द करत असल्याचं जेएनयूनं म्हटलं आहे. अनेक पर्यटन कंपन्यांनीही तुर्कीए

आणि अझर बैजानमधली नोंदणी रद्द केली, त्यामुळं तुर्कीएला जाणाऱ्या सुमारे १५ हजार प्रवाशांचीही नोंदणी रद्द झाली आहे.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दहशतवादा विरोधातल्या लढाईत सहकार्य वाढवण्यावर व्यापक चर्चा करण्यासाठी भारतीय प्रतिनिधी मंडळानं न्यूयॉर्क इथं संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधी अधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी संयुक्त राष्ट्रांचे प्रतिनिधी व्लादिमीर व्होरोन्कोव्ह आणि नतालिया घेरमन यांनी सुरक्षा परिषदेचा दहशतवाद विरोधी प्रस्ताव आणि संयुक्त राष्ट्रांचं जागतिक दहशतवाद विरोधी धोरण लागू करण्यात सहकार्य वाढवण्यावर भर दिला.

भारताच्या प्रतिनिधी मंडळानं यावेळी दहशतवादी गट आणि त्यांच्याशी संबंधित असलेल्यांना प्रतिबंध घालणाऱ्या सुरक्षा परिषदेच्या देखरेख पथकाचीही भेट घेतली. भारतीय प्रतिनिधी मंडळ टी.आर.एफ, म्हणजेच द रेजिस्टेंस फ्रंट या संघटनेनं पहलगाममध्ये केलेल्या हल्ल्याचे पुरावे या पथकासमोर सादर करणार आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि वीर जवानांना मानवंदना देण्यासाठी भारतीय जनता पक्षानं देशभर तिरंगा यात्रेचं आयोजन केलं आहे. येत्या २३ मे पर्यंत तिरंगा यात्रा देशभर सुरू राहणार आहे.

राजस्थानात जयपूर इथं निघालेल्या तिरांगा यात्रेत मुख्यमंत्री भजनलाल शर्मा सहभाही झाले होते. पंजाबमधे जालंधर इथं आज तिरंगा यात्रा निघणार आहे.

मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत काल मुंबईत तिरंगा यात्रा काढण्यात आली.

<><><><><>

बलुच राष्ट्रवादी नेत्यांनी पाकिस्तानपासून स्वतंत्र झाल्याची घोषणा केली आहे. अनेक दशकांचा हिंसाचार, सक्तीचा अज्ञातवास तसंच मानवाधिकारांचं उल्लंघन यापासून मुक्त होऊन, आता बलुचिस्तान प्रजासत्ताक अस्तित्वात येत आहे, अशा अर्थाचे संदेश समाज माध्यमांवर प्रसारित होत आहेत. स्वतंत्र राष्ट्राचा नकाशा आणि संभाव्य ध्वजाची छाया चित्रं देखील प्रसिद्ध झाली आहेत. प्रमुख बलुच नेते आणि लेखक मीर यार बलोच यांनी आंतरराष्ट्रीय समुदाय आणि संयुक्त राष्ट्रांकडे बलुचिस्तानच्या लोकशाही प्रजासत्ताकाला स्वायत्त देश म्हणून मान्यता देण्याची मागणी केली आहे.

<><><><><>

ग्लोबल ॲक्सेसिबिलीटी अवेअरनेस दिना निमित्त, दिव्यांग व्यक्ती सक्षमता विभागानं आज नवी दिल्ली इथं ‘इन्क्लुजिव्ह इंडिया परिषद’ आयोजित केली आहे. आजचा दिवस प्रत्येक क्षेत्रामध्ये दिव्यांग व्यक्तींप्रति समावेशकता वाढवण्याचं महत्व अधोरेखित करतो.

दिव्यांग व्यक्तींसाठी भाषा, जीवन, शिक्षण आणि उपजीविकेच्या संधी सहज उपलब्ध होणं महत्वाचं आहे, असं दिव्यांग व्यक्ती सक्षमता विभागाचे सचिव राजेश अग्रवाल यांनी या कार्यक्रमात सांगितलं. सांकेतिक भाषेच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार करत असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली, आणि कॉर्पोरेट क्षेत्रानं दिव्यांग व्यक्तींसाठी अनुकूल वातावरण निर्माण करावं असं आवाहन

केलं. दिव्यांग व्यक्तींचा  डिजिटल माध्यमात सहज प्रवेश आणि समावेशक विकास याबाबत जागरूकता वाढवणं हे या परिषदेचं उद्दीष्ट  आहे.

<><><><><>

राज्यविधीमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांवर कृती करण्यासाठी राज्यपालांना समयसीमा  देण्याचा  अधिकार न्यायालयाला आहे का अशी विचारणा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू  यांनी केली आहे. तमिळनाडू विधानसभेने मंजूर केलेली विधेयकं राज्यपालांकडे दीर्घ काळ प्रलंबित राहिल्याप्रकरणी  दिलेल्या निवाड्यात सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं होतं की विशिष्ट कालावधीत राज्यपालांनी विधेयकांवर निर्णय घेतला पाहिजे. मुदत न पाळल्यास राज्यपालांची संमती गृहीत धरण्यात यावी असंही न्यायालयाने म्हटलं आहे.

त्यासंदर्भात १४ वेगवेगळे प्रश्न राष्ट्रपतींनी उपस्थित केले आहेत. संविधानाच्या कलम २०० आणि २०१ मधे राज्यपालांच्या कार्यपद्धतीविषयीच्या तरतुदी आहेत, मात्र त्यात अशी समयसीमा पाळण्याबाबतचा उल्लेख नाही. तसंच हा निर्णय राज्यपाल आणि राष्ट्रपतींच्या संविधानदत्त शक्ती आणि अधिकारांवर अतिक्रमण करणारा आहे का याचा विचार करावा असं राष्ट्रपतींनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

<><><><><>

वक्फ सुधारणा कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर २० मे रोजी सुनावणी होईल असं सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितलं. याचिकाकार्त्यांचे वकील कपिल सिब्बल आणि सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी त्यांचं निवेदन १९ मे रोजी न्यायालयासमोर सादर करावं असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज यांच्या पिठानं सांगितलं. १९९५ च्या वक्फ

कायद्यातल्या तरतुदींना स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर कोणताही विचार केला जाणार नाही,  असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

भारतीय लष्कराच्या पूर्व कमांडनं मणिपूरच्या चंदेल जिल्ह्यात काल मध्यरात्री राबवलेल्या विशेष अभियानात बंडखोर  गटाचे १० सदस्य ठार झाले. गुप्तचर यंत्रणेकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर लष्कराच्या विशेष पथकानं ही कारवाई केली. यावेळी मोठ्या प्रमाणात शस्त्र आणि दारुगोळा हस्तगत करण्यात आला. ठार झालेल्या  बंडखोरांची ओळख पटली असून, ते  मणिपूरच्या डोंगराळ जिल्ह्यांमध्ये आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर कार्यरत बंडखोर गटाशी संबंधित असल्याचं उघड झालं आहे. ही कारवाई अजूनही सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

**<><><><><>**

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धांची आज सांगता होणार आहे. बिहारमधे पटना इथं  पाटलीपुत्र क्रीडा प्रेक्षागृहात हा सोहळा होईल. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, इतर प्रशासकीय अधिकारी, क्रीडाक्षेत्रातले इतर मान्यवर या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र पदकतालिकेत ५६ सुवर्ण आणि ४५ रौप्य पदकांसह १४९ पदकं मिळवून  अग्रस्थानी आहे. हरियाणाने काल जोरदार कामगिरी करत ३५ सुवर्ण आणि २६ रौप्य पदकांसह एकूण १०७ पदकं मिळवून दुसरे स्थान पटकावले. राजस्थान २२ सुवर्ण पदकांसह ५५ पदकं मिळवून तिसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्रानं काल ॲथलेटिक्स   स्पर्धेत दहा सुवर्ण पदकांसह १५ पदकं मिळवत ऐतिहासिक कामगिरी केली.

**<><><><><>**

देशाच्या पूर्व, पश्चिम, मध्य आणि ईशान्येकडच्या प्रदेशात पुढले २ ते ३ दिवस मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस पडेल, तर महाराष्ट्रात कोकण, गोवा, पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, राजस्थान, आणि अंदमान-निकोबार द्वीप समूहांवर हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा अंदाज आहे.

येत्या दोन दिवसांत उत्तरप्रदेश आणि राजस्थानमध्ये उष्णतेची लाट राहील असा अंदाज आहे. पश्चिम बंगालचा गंगेच्या खोऱ्यातला प्रदेश, झारखंड, तामिळनाडू, पुडुचेरी, करैकल, आणि आंध्रप्रदेशच्या किनारपट्टी भागात आज, तर बिहार आणि ओदिशामध्ये उद्या उष्ण आणि दमट हवामान राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.